नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १०/०५/२०२५ (शनिवार)

## डोरली शिवारात ,अंबिका फार्म मधील डॅफोडील्स विला येथे सुरू असलेल्या जुगार अड्डयावर धाड, ८ आरोपी ताब्यात ,एकुण २१,५५,४३०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त, उपविभागिय पोलीस अधिकारी सावनेर आणि पथक यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कळमेश्वर :—**दिनांक ०९.०५.२०२५ रोजी श्री अनिल म्हस्के , सहायक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग यांना गोपनिय बातमीदाराने माहीती दिली आहे कि, पोस्टे कळमेश्वर हद्दीमध्ये मौजा डोरली शिवारात अंबिका फार्म येथे काही इसम ५२ तासपत्त्यांवर पैसे लावुन हारजीत चा जुगार खेळत आहे. त्यानुसार श्री अनिल म्हस्के यांनी सावनेर उपविभागातील कळमेश्वर पोलीस स्टेशन चे प्रभारी अधिकारी, पोलीस निरीक्षक, श्री मनोज काळबांधे यांच्या नेतृत्वात पोलीस स्टेशन कळमेश्वर, पोलीस स्टेशन सावनेर, उपविभागिय पोलीस अधिकारी कार्यालय, सावनेर येथील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे विशेष पथक तयार करून सदर पथकाला घटनास्थळी रवाना केले. सदर पथक मौजा डोरली शिवारातील अंबीका फार्म मधील डॅफोडील्स विला येथे गेले असता डॅफोडील्स विला येथे मागचे खुल्या वरांडयामध्ये काही ईसम तासपत्यांवर पैशांचे हारजीतचा जुगार खेळ खेळतांना दिसुन आले. पोलीसांनी धाड टाकुन ८ आरोपीतांना पकडले. त्या अरोपीतांची नावे **१) शफीक रफीक शेख, वय ४१ वर्षे,रा. वार्ड नं. ०१ नवीन बायपास कळमेश्वर २) सचिन पुरूषोत्तम रोकडे, वय ३५ वर्ष, रा. वार्ड नं. १३ कळमेश्वर३) विलास दिगांबर आडे ,वय ४१ वर्ष, रा. वार्ड नं. १२ शेंदुरजना घाट ता. वरूड जि. अमरावती, ४) सूनिल ज्ञानेश्वर तडस, वय ३१ वर्ष ,रा. वार्ड नं. १६ शेंदुरजना घाट ता. वरूड जि. अमरावती, ५) विशाल प्रकाश महात्मे ,वय ३३ वर्ष ,रा. वार्ड नं. १७ वरूड ता. वरूड जि. अमरावती, ६) सुरज अशोक आढाउ,वय ३२ वर्ष, रा. वार्ड नं. १२ शेंदुरजना घाट ता. वरूड जि. अमरावती , ७) रविन्द्र मधुकर ढवळे, वय ३३ वर्ष, रा.**

**वार्ड नं. १७ शेंदुरजना घाट ता. वरूड जि. अमरावती , ८) रोशन रमेश बगाडे वय ३३ वर्ष रा. वार्ड नं. ३ पुसला ता. वरूड जि. अमरावती यांना ताब्यात घेतले.**

**पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष ८ आरोपीतांच्या अंगझडतीत ३५,२००/— रूपये डावावरचे नगदी ११,२००/— रूपये.,५२ पत्ते तासपत्तेचे , ९ अॅड्रॉईड मोबाईल तसेच सदर डॅफोडील्स विला चे कंपाउंन्डचे आत व मागील बाजुस उभी असलेली वरील जुगार खेळणाऱ्या इसमांचे वाहन १) एक पांढऱ्या रंगाची मारूती सुझुकी स्वीफ्ट कार क्र. एम.एच. २७ ए.आर. ६६५८ किमती ५,००,०००/— रू. तसेच २) एक पांढऱ्या रंगाची मारूती सुझुकी स्वीफ्ट कार क्र. एम.एच. ३५ ए.आर. ३११७ किमती ५,००,०००/— रू. ३) एक पांढऱ्या रंगाची मारूती सुझुकी वॅगनार कार क्र. एम.एच. २७ डि.एल ८५७२ किमती ४,००,०००/— रू. ४) एक टोयोटा ईनोवा कार क्र. एम.एच. ३१ सी.डी. ०९९९ किंमती ६,००,०००/— रू. अशी वाहने असा एकुण २१,५५,४३०/— रूपयांचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला आहे.**

**वर नमुद ८ आरोपीतांवर पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे म.जु.का. कलम १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद ४५ लाख ४० हजारांचा मुद्देमाल जप्त मौदा पोलीसांची कामगिरी १ आरोपी अटक

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक १०/०५/२०२५ रोजी मौदा पोलीस हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, भंडारा कडुन नागपुर कडे अवैधरित्या विनापरवाना रेती एल.पी ट्रक मध्ये लोड करून रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मथनी टोल नाका येथे नाकाबंदी केली

असता  एल.पी ट्रक क्रमांक एम.एच—४०—सी.एम—६५९६ हा मिळुन आला. वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यात रेती भरून होती. वाहन चालकाला त्यांचे नाव व पत्ता विचारले असता चालकाने त्याचे **नाव शेख नाशिर शेख मिशाद, वय २४ वर्षे , रा.गुलीस्ता नगर, अमरावती जि. अमरावती असे असल्याचे सांगितले. सदर वाहन चालकाला रेती वाहतुक परवाना बाबत विचारपुस केली असता त्याचेकडे रेती वाहतुकीचा कोणताही  परवाना नसल्याचे त्याने सांगितले. वाहन मालकाबाबत विचारपुस केली असता वाहन मालक नामे शेख अशपाक शेख नासिर ,रा. नागपुर असे नाव पोलसांना समजले.** पोलीसांनी पंचासमक्ष **१) एल.पी ट्रक क्रमांक एम.एच—४०—सी.एम—६५९६ किंमती ४५,००,००० /— रूपये, २)  ८ ब्रास रेती किंमती ४०,००० /— रूपये असा एकुण ४५,४०,०००/—  रूपयाचा  मुददेमाल जप्त केला आहे.**

**सदर प्रकरणी नमुद आरोपी वाहन चालक आणि मालक  याच्या विरूध्द पोस्टे मौदा येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) म.ज म सहीता, सहकलम ४,२१. खान खनिज अधिनियम सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चालक आरोपीला अटक करण्यात आली आहे.**


KTS
GOODS CARRIER
NAWAZ
AMAYRA
AYZAL
MH.40.CM.6596

# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
# २० लाख २० हजारांचा मुद्‌देमाल जप्त ,१ आरोपी अटक
# स्थानिक गुन्हे शाख नागपुर ग्रमीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कुही**:— दिनांक ०९/०५/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक कुही पोलीस स्टेशन हद्‌दीत अवैध धंदयावर कारवाई करणे कामी पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा खापरी फाटा, पचगाव येथे नाकाबंदी केली असता ट्रक क्रमांक **एम.एच ४० बीजी ४०८६** हा मिळुन आला. वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यात रेती भरून होती. वाहन चालकाला त्यांचे नाव व पत्ता विचारले असता चालकाने त्याचे **नाव** लंकेश सुरेद्र तुमसरे, वय २९ वर्षे , रा.बहादुरा,नागपुर **असे असल्याचे सांगितले. सदर वाहन चालकाला रेती वाहतुकीच्या परवाना बाबत विचारपुस केली असता त्याचेकडे रेती वाहतुकीचा कोणताही परवाना नसल्याचे त्याने सांगितले. वाहन मालकाबाबत विचारपुस केली असता सदर वाहन त्याच्याच मालकीचे असल्याबाबत माहीती पोलीसांना प्राप्त झाली.** पोलीसांनी पंचासमक्ष **१) ट्रक क्र. एमएच ४० बीजी ४०८६ किंमती २०,००,००० /— रूपये, २) ४ ब्रास रेती किंमती २०,००० /— रूपये असा एकुण २०,२०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

सदर प्रकरणी नमुद आरोपी वाहन चालक /मालक याच्या विरूध्द पोस्टे कुही येथे कलम ३०३(२), ४९ भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) म.ज म सहीता, सहकलम ४,२१. खान खनिज अधिनियम सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. **चालक/माल आरोपीला अटक करण्यात आली आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने